**रे.मु.नं.१६८/२०२१ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश**
**(भाऊसाहेब बाजीराव मांडे वगैरे विरुध्द मच्छिंद्र तुळशीराम मांडे वगैरे)**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे ऑर्डर ३९ रुल १ व २ प्रमाणे सर्व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील क्षेत्रावर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी केला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन कीः**–

२. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुद्ध जाहीर ठरावासाठी, वाटप व निरंतरचे मनाई हुकूमासाठी केला आहे. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित वस्तीपड मिळकत आहे. सदरची मिळकत ही वादी क्रं.१ व वादीचे भाऊ सर्जेराव, नारायण व तुळशीराम यांचे नावावर फेरफार क्रं.८२५ अन्वये प्रत्येकी ० हे ५ आर प्रमाणे आली. गट क्रं.२६१ मधील मिळकतीचे वादी क्रं.१ चे चुलत भाऊ– दत्तात्रय दगडू मांडे व इतर यांचे अर्जावरुन वाटप करण्यात आले. परंतु, नंतर दत्तात्रय मांडे यांनीच रे.मु.क्रं.२३३/१९९४ चा दावा हा फेरफार क्रं.८२५/१९०० ची नोंद रद्द करणेसाठी केला परंतु, तो दावा खारिज करण्यात आला. त्यानंतर फेरफार क्रं.२३८० अन्वये पूर्वीप्रमाणेच फेरनोंद मंजूर करण्यात आली.

३. पुढे वादीने कथन केले की, दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीत वादी व या प्रतिवादी यांची वहिवाट असून त्यामध्ये 'कौटुंबिक व्यवस्था' म्हणून त्यांनी राहण्यासाठी घरे बांधली आहेत व ते ग्रामपंचायतीचे कर देखील भरत आहेत. सदर मिळकतीमध्ये इतर लोकांनी अतिक्रमण केल्यामुळे वादी व वादीचे भाऊ यांनी रे.मु. क्रं.२१८/१९९६ हा दावा अतिक्रमण काढून मिळणेसाठी दाखल केला होता. त्यावेळी वादी क्रं.१ चे भाऊ 'तुळशीराम' हे 'कुटुंबकर्ता' म्हणून कारभार पाहात होते, त्यामुळे त्यांनी त्या दाव्यात या दावा मिळकतीचा ताबा

वादीकरिता व स्वतःकरिता घेतला. तसेच तुळशिराम मांडे, राजेंद्र ज्ञानदेव शिंदे व इतर यांच्यामध्ये वाद झाला. त्यामुळे तुळशिराम यांनी राजेंद्र शिंदे व इतरांविरुद्ध मनाईचा दावा दाखल केला. त्यामध्ये मनाईचा आदेश नाकारल्याने तुळशिराम यांनी मा. जिल्हा न्यायालय येथे अपिल दाखल केले व आदेश करुन घेतला. त्यावेळी या वादींनी तुळशिराम मांडे यांना मिळकतीबाबत कोणतेही हक्कसोडपत्र करुन दिलेले नसताना त्यामध्ये तसा खोटा मजकूर लिहून त्यांनी तो दावा व अपिल दाखल केले. तसेच प्रतिवादी यांनी महसूल कार्यालयाकडे वादींची नावे कमी करण्याबाबत खोटे अपिल दाखल केले.

४. पुढे वादीने कथन केले की, सदर दावा मिळकतीत वादीचा प्रत्येकी १/४ हिस्सा आहे. सदर मिळकतीचे अद्याप दिशा दाखवून सरस–निरस मानाने वाटप झाले नाही. सदर दावा मिळकत ही नगर–दौंड हायवे रस्त्याला असून प्रतिवादी यांनी सदर मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे दक्षिण–उत्तर बांधकाम रस्त्याचे दर्शनी बाजूने सुरु केले आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादीस सरस–निरस मानाने वाटप झालेनंतर बांधकाम करण्यास समजावून सांगितले. याउलट प्रतिवादी यांनी वादींनाच धमकी देऊन वाटप करुन देण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे वादीने दावा कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये या प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये म्हणून 'तुर्तातूर्त मनाई' आदेश मिळण्यासाठी विनंती केली आहे.

**<u>प्रतिवादी क्रं.१ ते ४ तर्फे प्रतिकथन की,</u>**

५. प्रतिवादी यांनी निशाणी क्रं.२१ प्रमाणे म्हणणे दाखल करुन या अर्जावर हरकत दर्शविली आहे. प्रतिवादीने प्रतिकथन केले की, सुमारे ३५ ते ४० वर्षांपूर्वी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाटप झाले आहे व तेव्हापासून ते विभक्त राहतात. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीत इतर इसमांचे पक्के बांधकाम होते, त्यामुळे तुळशिराम मांडे यांनी रे.मु.क्रं.२१८/१९९६ हा दावा दाखल करुन त्यात वादी क्रं.१ व नारायण मांडे यांचे वारस आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट केले आहे. त्याच वेळी या वादीने प्रतिवादीचे लाभार्थ हक्क व अधिकार सोडून दिले. त्यानंतर मे. कोर्टाने दावा मंजूर केला. त्यानंतर तुळशिराम यांनी रे.दरखास्त क्रं.२६८/२००३ दाखल केली. त्यावेळी वादी कोर्टात हजर राहिले नाहीत.

त्यानंतर मे. कोर्टाने त्या मिळकतीचा पोलिस व बेलिफमार्फत 'तुळशिराम मांडे' यांच्याकडे रिक्त ताबा दिला. तो ताबा आजही प्रतिवादीकडे आहे. वादीने ही बाब मे. कोर्टापासून लपवून ठेवली. तसेच, या वादीने आजपावेतो या ताबेपावतीबाबत कोठेही तक्रार नोंदविली नाही. त्यानंतर तुळशिराम मांडे व प्रतिवादी यांनी मिळून रे.मु.क्रं.७०/२०१३ हा दावा वादी व इतर प्रतिवादींविरुद्ध दाखल केला. त्यामध्ये वादीने निशाणी ५ ला वहिवाटीस हरकत करु नये म्हणून मनाई हुकूमाचा अर्ज केला. तो अर्ज कोर्टाने नामंजूर केल्याने, तुळशिराम मांडे यांनी मा. जिल्हा न्यायालय अहमदनगर येथे कि.अ.क्रं.५०/२०१७ दाखल केला. ते अपिल मंजूर होऊन तो हुकूम आजही कायम आहे व त्या हुकूमाविरुद्ध वादीने कोठेही तक्रार केली नाही. त्यामुळे, सदर दावा मिळकतीमध्ये फक्त या प्रतिवादीचा हिस्सा आहे.

६. पुढे प्रतिवादीने प्रतिकथन केले की, वादी हे या मिळकतीव्यतिरिक्त सोयीनुसार इतरत्र बांधकाम करुन राहात आहेत. तसेच, सध्या प्रतिवादी यांनी दोन गुंठे क्षेत्रात बांधकाम सुरु केले असून ते बांधकाम स्लॅब लेवलला आले आहे. त्यासाठी प्रतिवादीने सात लाख रुपये खर्च केला आहे. तसेच, प्रतिवादीने ग्रामपंचायतीकडून बांधकामासाठी मंजूरी घेतली आहे. तसेच, सदरचे बांधकाम प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत असून ते बांधकाम ग्रामपंचायत मिळकत क्रं.८६८ मध्ये घरकूल अंतर्गत चालू आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीकडून रु.७५,०००/– मंजूर झाले असून ते प्रतिवादीला मिळू नये म्हणून प्रतिवादीचे बांधकाम बंद पाडावे म्हणून वादीने हा दावा दाखल केला आहे. तसेच रस्ता वहिवाट केसमध्ये वादी हे पक्षकार नाहीत. रस्ता वहिवाट केसमध्ये सुद्धा प्रतिवादीच्या बाजूने निकाल झाला आहे. त्यामुळे प्रतिवादीने प्रस्तुतचा वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यास विनंती केली आहे.

७. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. वरील सर्व बाबी लक्षात घेता, खालील वादप्रश्न माझे विचारार्थ निश्चित होतात व त्यांचे निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | **नाही** |
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **नाही** |
| ४. | आदेश काय ? | **वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

## ::कारणमिमांसा::

८. या अर्जाकामी वादी यांनी नि. क्रं.३ च्या कागदपत्रांसोबत गट क्रं.२६१/२ चा सातबारा उतारा, तसेच फेरफार क्रं.८२५ व फेरफार क्रं.२३८० ची नक्कल दाखल केली आहे. प्रतिवादी यांनी निशाणी २५ च्या कागदपत्र यादीसोबत रे.मु.क्रं.२१८/१९९६ मधील हुकूमनाम्याची प्रत तसेच रे.द.क्रं.२६८/२००३ मधील निशाणी १ व कब्जा पावतीची नोटराईज्ड प्रत दाखल केली आहे. रे.मु.क्रं.७०/२०१३ ची निशाणी १ ची व कि.अ.क्रं.५०/२०१७ मधील न्यायनिर्णयाची छायांकित प्रत दाखल केली आहे. तसेच, तहसिलदार यांच्याकडील रस्तावहिवाट केस व त्यावरील आदेशाची नक्कल दाखल केली आहे. तसेच, ग्रामपंचायत मढेवडगांव यांनी कमल मांडे यांना दिनांक १५/०३/२०२१ रोजी घरकुल मंजूर झाल्याची छायांकित प्रत दाखल केली आहे. वादी यांनी निशाणी क्रं.२७ सोबत मिळकत क्रं.८६७, ८७० व ८६९ चा ८/अ चा उतारा दाखल केला आहे, तसेच वादी यांनी दिनांक २५/०२/२०२१, ११/०६/२०२१ ची करवसूली पावती दाखल केली आहे. तसेच, वादीने दिनांक १५/०४/२०२१ रोजी ग्रामविकास अधिकारी मढेवडगांव यांच्याकडे दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केली आहे. वादीने या अर्जाकामी भिमाबाई कोंडीबा शिंदे, दमयंती सदाशिव जगताप यांचे शपथपत्र दाखल केले आहे. याउलट प्रतिवादीने निशाणी क्रं.३४ वर पुरसिस देऊन कथन केले की, दावा मिळकतीतील वाद विषयावर त्यांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

**वादप्रश्न क्र. १ ते ३ करिताः–**

९. वादप्रश्न क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यावरील होणा–या विश्लेषणची पुनरावृत्ती टाळण्याकरिता वरील तीनही वाद प्रश्न एकत्रित विश्लेषीत करण्यात

आले आहेत.

**१०.** वादी व प्रतिवादी यांना मान्य असलेल्या बाबी या पुढील प्रमाणे आहेत. दावा मिळकती मधील क्षेत्र हे वादी व प्रतिवादी व त्यांचे इतर भाऊ यांच्या नावावर फेरफार नंबर ८२५ नुसार प्रत्येकी ० हे. ५ आर इतके क्षेत्र आले होते. त्यानंतर पुन्हा फेरफार क्रमांक २३८० अन्वये वादी प्रतिवादी व त्यांचे भाऊ यांचे नावावर ० हे. ५ आर इतके क्षेत्र आले होते. तसेच दावा मिळकती संदर्भात रे. मु. क्र. २३३/१९९४, रे. मु. क्र. २१८/१९९६, रे. मु. क्र. ७०/२०१३, रे. द. क्र. २६८/२००३, २३३/१९९४, कि.अ.क्र. ५०/२०१७ दाखल झाले होते व त्यावर न्यायनिर्णय देखील झाले आहेत.

**११.** वादी यांच्या कथनानुसार दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित 'वस्तीपड' मिळकत असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांनी 'कौटुंबिक व्यवस्था' म्हणून राहण्यासाठी घरे बांधली आहेत व ते ग्रामपंचायतीचे कर देखील भरत आहेत. तसेच वादीने कथन केले की, दावा मिळकतीचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही व वादी यांनी 'तुळशीराम मांडे' यांना दावा मिळकतीबाबत कोणतेही हक्कसोड पत्र करून दिलेले नाही. याउलट, प्रतिवादी यांच्या कथनानुसार तुळशीराम मांडे यांनी रे. मु. क्र. २१८/१९९६ हा दावा दाखल केला होता, त्यावेळी वादीने प्रतिवादीच्या लाभार्थ हक्क व अधिकार सोडून दिले होते. त्यानंतर तुळशीराम यांनी रे.द.क्र.२६८/२००३ दाखल केली त्यावेळी बेलिफ तसेच पोलिसांमार्फत दावा मिळकतीचा रिक्त ताबा 'तुळशीराम मांडे' यांच्याकडे देण्यात आला.

**१२.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फेरफार क्रमांक ८२५ व फेर नोंद फेरफार क्रमांक २३८० नुसार वादी, प्रतिवादी व त्यांचे इतर भाऊ यांच्या नावावर प्रत्येकी ० हे. ५ आर इतके क्षेत्र आले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार, रे. मु. क्र. २६८/१९९६ मध्ये वादीने प्रतिवादींच्या लाभार्थ हक्क व अधिकार सोडून दिले होते. परंतु याबाबत प्रतिवादींनी अभिलेखावर कोणताही प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. तसेच प्रतिवादी यांनी रे. द. क्रमांक २६८/२००३ मधील कब्जा पावती व निशाणी १ वरील आदेश दाखल केले असून, त्यावरुन हे स्पष्ट होते की, दावा मिळकतीचा ताबा त्यावेळी 'तुळशीराम

मांडे' यांच्याकडे दिला होता व त्या दिवशी भाऊ मांडे, अनिल मांडे व त्या केसमधील इतर प्रतिवादी हजर नव्हते. त्यादिवशी विनातक्रार सदर मिळकतीचा ताबा 'तुळशीराम मांडे' यांच्याकडे देण्यात आला होता. वादींनी असा युक्तिवाद केला की, रे. मु. क्र. २६८/१९९६ मधील आदेशानुसार दावा मिळकतीचा ताबा सर्व वादीकरिता तुळशीराम मांडे यांनी स्विकारला होता. परंतु वादी यांनी देखील याबाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे रे. मु. क्र. २६८/१९९६ मधील आदेशानुसार दावा मिळकतीचा ताबा प्रतिवादीकडे सर्व वादीकरिता देण्यात आला होता किंवा नाही हा एकंदरीतच पुराव्याचा भाग आहे. परंतु सद्यस्थितीत कब्जा पावती वरून दावा मिळकतीचा ताबा हा 'तुळशीराम मांडे' यांच्याकडे सुपूर्त करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

**१३.** उपरोक्त कारणास्तव प्रतिवादींकडे दावा मिळकतीमध्ये प्रथमदर्शनी असलेला ताबा हा मे. कोर्टामार्फत दिला असल्याने तो 'जस्टीफाईड' दिसून येत असून, सदर कब्जा पावतीवर प्रस्तुत वादी यांनी अद्यापपर्यंत कोणतीही हरकत/कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादीने प्रथमदर्शनी केस सिद्ध केली नाही व न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने नाही. याउलट प्रतिवादी यांनी त्यांचा प्रथमदर्शनी ताबा सिद्ध केला असून, त्यांनी सदर दावा मिळकतीमध्ये बांधकाम पूर्ण केल्याची पुरसिस देखील दाखल केली आहे. त्यामुळे वादीने मागणी केल्याप्रमाणे 'तुतातूर्त मनाई हुकूम' दिल्यास या प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. उपरोक्त सर्व कारणास्तव मी वादप्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून प्रश्न क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वादींचा निशाणी क्रमांक ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

SWATI GANPAT JADHAV
Digitally signed by SWATI GANPAT JADHAV
Date: 2022.03.28 17:28:27 +0530

**(श्रीमती.एस.जी.जाधव)**

दिनांकः २८/०३/२०२२

सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,श्रीगोंदा,
ता. श्रीगोंदा, जि.अहमदनगर.

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करते की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव – श्रीमती एस. व्ही. जाधव

न्यायालयाचे नाव – न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.१) श्रीगोंदा.

पी.डी.एफ.अपलोड केल्याचा दिनांक – २८/०३/२०२२

स्वाक्षरित /–
लघुलेखक